## ------- प्रेस नोट --------

## सिंधुदुर्ग पोलीस

## दिनांक- 16.11.2020

दिवाळी सण महाराष्ट्रासह कोकणात उत्साहात साजरा केला जातो. दिवाळी उत्सवामध्ये नरक चतुर्दशी, लक्ष्मी पूजन, बलिप्रतिपदा, पाडवा, भाऊबीज असे सण उत्साहात साजरे केले जातात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही मोठ्या उत्साहात दिवाळी सण साजरा केला जात आहे.

सध्या संपुर्ण देशात असलेले कोरोना विषाणू महामारी, तसेच इतर कायदा व सुव्यवस्था बंदोबस्तासाठी सिंधुदुर्ग पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार व्यस्त आहेत. त्यातच दिवाळी सण असून पोलीस अधिकारी व अंमलदार यांना इतरांप्रमाणे आपल्या कुटुंबियांसोबत सण साजरा करणे शक्य होत नाही. त्यामुळे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसाठी श्री.राजेंद्र दाभाडे, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचे संकल्पनेतून आज दिनांक 16.11.2020 रोजी दुपारी 12:30 वा. पोलीस मुख्यालय, सिंधुदुर्ग येथे भाऊबीज सणाचे आयोजन करण्यात आले.

सदर भाऊबीज सणाकरीता श्रीमती. दाभाडे, श्री.जगदीश काकडे, पोलीस निरीक्षक (मानव संसाधन शाखा, सिंधुदुर्ग), श्री. रमेश चाकाटे, राखीव पोलीस निरीक्षक यांचेसह महिला पोलीस अंमलदार उपस्थित होते. सदर उपक्रमाबाबत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकडून समाधान व्यक्त करण्यात आले.

( राजेंद्र दाभाडे )

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग

प्रति,

जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग

2/- सदर प्रेस नोटची सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकप्रिय दैनिक वर्तमान पत्रांमध्ये विनामुल्य प्रसिध्दी करावी.